पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ४०**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ५/१/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ८८६**

मा.सौ.प्राची आल्हाट व मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि. २४/१२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. २६ महंमदवाडी कौसरबाग पुणे मनपाच्या कै.दशरथ बळीबा भानगिरे दवाखाना येथे केवळ बाहयरुग्ण विभाग कार्यरत आहे. महंमदवाडी या परिसरामध्ये वैद्यकिय सुविधा पुरविणारे मनपाचे कोणतेही मोठे रुग्णालय नाही. या परिसरामध्ये गरीब व मध्यम वर्गीय नागरिक मोठया प्रमाणात राहतात अधिक खर्चाचा वैद्यकीय उपचार या नागरिकांना परवडणारे नसतात पुणे मनपाकडे आवश्यक कुशल मनुष्यबख उपलब्ध नसल्यामुळे आउटसोर्सिंगद्वारे किंवा पी.पी.पी. तत्वावर सदरची सेवा शासकीय दरात उपलब्ध करुन मिळावी. यामुळे सदर दवाखान्यात विविध उपचार जसे आय.सी.यु. आणि कॅन्सर उपचार व इतर अनुषंगिक उपचार शासकीय दरात माफक दरात उपलब्ध करुन मिळावे या योजनेचा गोरगरीबांसाठी आरोग्य विषयक फायदा होणार आहे.

तरी सदर योजना तातडीने राबविण्यात यावी.

**विषय क्र. ८८७**

मा.पृथ्वीराज सुतार व मा.बाळा ओसवाल यांचे दि. २८/१२/२०२० चे पत्र.

मोटार वाहन विभागाकडे १३०५ वाहने व १४०० मोटार सारथी असून या सर्व वाहनांवर मोटार सारथी वर नियंत्रण ठेवून काम करणे आवश्यक झाले असल्याने मनपा प्रशासनाकडून राज्य शासनाकडे मोटार वाहन विभागाकरिता (१) वाहतुक व्यवस्थापक या पदाची निर्मिती करुन सदरचे पदास राज्य शासनाची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव पाठविण्यात आला होता या प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगर विका. स विभाग शासन, निर्णय क्रमांक पी.एम.सी. ३०१६/प्र.क्र.३२१/ना वि २२ मंत्रालय ४०००३२ दिनांक १४ जुलै २०२० नुसार मान्यता मिळालेली आहे.

मोटार वाहन विभागाकडील १३०५ वाहनाचे सध्या नियोजन करणेकरिता व या वाहनांवरील वाहन चालकावर नियंत्रण ठेवण्यासाठी सदरचे पद तातडीने भरणे आवश्यक आहे. मोटार वाहन विभागाकडे रुग्णवाहिका अधिकारी व पद, विभाग अग्निशामक अधिकारी घनकचरा विभाग पाणीपुरवठा अतिक्रमण विभाग विविध विभागाची आवश्यक असणारी वाहने हे २४ तास कार्यरत आहेत पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनाचे नियोजन हे शहराच्या दृष्टीने योग्य पध्दतीने होणे आवश्यक आहे व ही वाहने योग्य रित्या नियोजन करुन कार्यरत राहिल्यामुळे नागरिकांना अधिक चांगल्या पध्दतीने सुविधा मिळणार आहे.

मोटार वाहन विभागाकडील (वाहतुक व्यवस्थापक) पद शासनाने दिलेल्या आदेशानुसार मनपा पात्र सेवकामधून १००% पदोन्नतीने भरण्याचे कार्यवाही त्वरीत सामान्य प्रशासनाने करावी.

**विषय क्र. ८८८**

मा.राजाभाऊ बराटे यांचे दि. २८/१२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. ३१ मधील कर्वेनगर येथील मुख्य चौकांमध्ये पुणे महानगरपालिकेमार्फत लाखो रुपये खर्च करुन भुयारी मार्ग विकसित करण्यात आला होता. परंतू गेल्या अनेक महिन्यांपासून सदर भुयारी मार्ग बंद असून सदर भुयारी मार्गाचा देखील वापर होत नाही. तरी पुणे महानगरपालिकेने सदर भुयारी मार्गामध्ये गाळे (दुकाने) विकसित करुन भाडेतत्वावर द्यावेत जेणेकरुन स्थानिक युवा लघु व्यावसासियांकाना देखील सदर गाळयांचा उपयोग करता येईल आणि महानगरपालिकेस महसुल प्राप्त होईल व नागरिकांनादेखील भुयारी मार्गाचा वापर करणे शक्य होईल.

**विषय क्र. ८८९**

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २९/१२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.३२ वारजे माळवाडी मधील खान वस्ती समोरील दफनभुमीमध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, बजेट कोड - सीई२०बी१०२/एसटी२-१२०७, प्रभाग क्र.३२ क मध्ये नादब्रम्ह सोसायटी मुख्य रस्त्यालगत कॉर्नर सुशोभिकरण करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.३२ वारजे माळवाडी मधील खान वस्ती समोरील दफनभुमीमध्ये विविध विकास कामे करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. ८९०**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १/१२/२०२० ते दि.१५/१२/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/५२२ दि.२४/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ८९१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ५/९/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ५/९/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१६३० दि. २३/१२/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ८,९५,१३३/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ८९२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १२/९/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १२/९/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१६३१ दि.२३/१२/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ३,६१,१४४/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ८९३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १९/९/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १९/९/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१६३२ दि.२३/१२/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ३,८१,२५१/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ८९४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २६/९/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २६/९/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१६३३ दि.२३/१२/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ३९,४८,७३६/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ८९५**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि.१ ते १५ डिसेंबर २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/५४१ दि.३०/१२/२०२० चे पत्र.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्र. ८९६**

पुणे महानगरपालिकेचे Covid care center (CCC) येथील कामकाजाकरिता एकवट वेतनावर, ९० दिवस कालावधीसाठी, तात्पुरत्या स्वरुपात "डाटा एन्ट्री ऑपरेटर" यांची नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/५४० दि.३०/१२/२०२० चे पत्र.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. ८९७**

पर्वती विधानसभा मतदार संघातील स.नं. २० हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे पोलिस चौकी बांधणे व विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ब्रम्हा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,०८,८०५/- पेक्षा ३.७५% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.९१,३९,१३५=१८ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रुपये १०,९६,६९६=२२ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ३३,५८२=३८ अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १,००,११८/- पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील भाववाढ व सिमेंट, स्टिल यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/५२८ दि. २४/१२/२०२० चे पत्र.

**संकीर्ण**

**विषय क्र. ८९८**

महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम कलम ६७ (३) (क) मधील तरतुदीच्या अनुषगांने पुणे शहरामध्ये कोरोना या विषाणूजन्य महामारीवर नियंत्रण मिळविणेसाठी करावयाचे उपाय योजना अंतर्गत मे. चिनु ट्रॅव्हलर्स, पुणे यांना त्यांचेकडून दि.०१/०८/२०२० ते दि.१५/१०/२०२० रोजी पर्यत घेण्यात आलेल्या वाहनांचे मोटार वाहन विभागाकडील भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेले वाहने घेणेकामी शेड्युल मान्य दरानुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे एकूण रक्कम रु.९७,१७,८६०/- (अक्षरी रु.सत्याणव लाख सतरा हजार आठशे साठ फक्त ) इतक्या रक्कमेची देयके आदा करणेत आल्याची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/५२६ दि. २४/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ८९९**

पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हंटस् को-ऑप अर्बन बँक यांना महानगरपालिका भवनातील ६'x १०' सुविधा केंद्राची खोली पूर्वीचे मासिक भाडे रक्कम रू. ३,१६९/- आकारून खालील अटीं व शर्तीवर उपलब्ध करून देणेत येईल.

१) महानगरपालिका प्रशासनास केव्हाही सदर जागेची आवश्यकता भासल्यास बँकेस सदर जागा ताबडतोब रिकामी करावी लागेल,

२) बँकेस सदर जागेवर कोणत्याही स्वरूपाचा कायमस्वरूपी हक्क सांगता येणार नाही,

३) सदर जागेमध्ये बँकेस कोणतेही आर्थिक व्यवहार (उदा. पैशाची देवाणघेवाण )करता येणार नाही,
४) बँक व्यवहाराबाबत काही गैरप्रकार निदर्शनास आल्यास बँकेस सुविधा केंद्रामध्ये व्यवहार करण्यास मनाई करण्यात येईल,

तरी उपरोक्त निवेदन अवलोकन होवून खालील अ.क्र. १ व २ बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्या/४३३, दि.१७/११/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. ७३ दि.१२/११/२०२० विचारासाठी.

१) पुणे म्युनिसिपल कॉर्पोशन सर्व्हंटस् को-ऑप अर्बन बँक लि. पुणे यांना पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील, नागरवस्ती विकास योजना कार्यालयाजवळील जीन्याखालील (६' X १०') सोमवार ते शुक्रवार कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत अटी व शर्तीस अधीन राहून पुढील ५ वर्ष कालावधीसाठी (दर ३ वर्षांनी १२% भाडेवाढ) मासिक भाडे रक्कम रू. ३१६९/- प्रमाणे देणेस,
२) सदर मिळकत करार मुदत संपलेल्या दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी (दर ३ वर्षांनी १२% भाडेवाढ) उपरोक्त अटी शर्तीस अधीन राहून भाडेकराराने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलित दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हंटस् को-ऑप अर्बन बँक लि. पुणे यांचे सोबत करारनामा करण्यास

**विषय क्र. ९००**

मेट्रो प्रकल्पाने बाधित लोकांचे पुनर्वसन करणेसाठी उपलब्ध करून देण्यात वडगांव बु।। येथील सुविधा प्रोजेक्टमधील ६० सदनिकांचे रक्कम रूपये ३०५५/- प्रति सदनिका इतके मासिक भाडे आकारून दिनांक ०२/१२/२०२० पासून पुढील तीन वर्षे कालावधीकरिता मुदतवाढ देणेबाबतचे आणि तदनुषंगिक करारनामा करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्या/४१२, दि. ०२/११/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. ८१ दि.१२/११/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. ९०१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये ज्या मिळकतीचे मूल्य र. रू. ५००/- पेक्षा अधिक नसेल किंवा शासनाने मान्यतेने महापालिकेने निश्चित केलेल्या मूल्यापेक्षा अधिक नसेल अशा मिळकती भाडेकराराने देण्याबाबत नमूद आहे. तसेच कोणतीही स्थावर मालमत्ता भाडेकराराने हस्तांतरित करताना द्यावयाचे भाडे/प्रिमियम रक्कम मिळकतीचे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांची प्रचलित मूल्यनिर्धारण सूचीतील चालू बाजार किंमत अथवा ती जागा संपादित करणेकरिता आणि विकसित करणेकरिता आलेल्या खर्चाची एकूण बेरीज यापैकी जी जास्त असेल त्या रकमेपेक्षा कमी असणार नाही अस नमूद केले आहे. सदर जागेचे मासिक भाडे चालू शिप्रसिध्दगणकानुसार र. रू. २,१०,८६८/- इतके होत आहे.

तसेच संदर्भ क्र. १ चे पत्रान्वये पी.एम.पी.एम.एल. ने सदर जागेची मागणी केली आहे. मिळकत वाटप नियमावली भाग ६(१) व ६ (५) नुसार मा. महापालिका आयुक्त यांना प्रथम १२ महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी व त्यांनतर मा. मुख्य सभेच्या मान्यतेने कमाल ३० वर्षेपर्यंत जागा भाडेकराराने देता येते. त्यामुळे सदर जागा ही पुणे महानगर परिवहन महामंडळास प्रथम ११ महिने व त्यानंतर ३० वर्षे मुदतीसाठी भाडेकराराने देण्यास मा. मनिषा कदम, मा. श्रीमती रंजना टिळेकर, मा. सौ. वृषाली कामठे व मा. वीरसेन जगताप यांचे दि. ०९/०३/२०२० चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १, दि. १२/०६/२०२० चे पत्र तसेच पी.एम.पी.एम.एल. कडील जा. क्र. पी.एम.पी.एम.एल./स्थावि/८४२,दि. ४/०८/२०२० चे पत्रावर मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्या/४०९, दि. ०२/११/२०२० ने पाठविलेला अभिप्रायावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. ८२ दि.१२/११/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. ९०२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टॅक्स/५३१ दि.३०/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ९०३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टॅक्स/५३२ दि.३०/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ९०४**

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयाच अंतर्गत कै. रामचंद्र (अप्पा) बनकर इंग्लिश मिडीयम स्कूल (मनपा शाळा), गोंधळे नगर, हडपसर, पुणे २८ येथे स्थापित केलेल्या/क्वारंटाईन/ CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण पुरविणे इत्यादि कामे मे. दुर्वाकुर महिला बचत गट, स.नं.१३, सातववाडी, गोंधळेनगर, हडपसर,पुणे २८. या महिला बचत गटाकडून र.रु.१८४=५० प्रति दिन/व्यक्ति+जीएसटी इतक्या दराने दि.२४/१०/२०२० रोजी पासून करून घेणेसाठी खालील नमूद बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/परि.क्र.४/५३३ दि. ३०/१२/२०२० चे पत्र.

१. मे.दुर्वाकुर महिला बचत गट, स.नं.१३, सातववाडी, गोंधळेनगर, हडपसर,पुणे २८ यांनी सादर केलेल्या र.रु.१८४=५० प्रति दिन/व्यक्ति+जीएसटी या दराने जेवण पुरवठा करणेसाठी त्यांची नेमणूक करणेस व त्यांनुसार त्यांचेशी करार करणेस,
२. त्यानुसार मे.दुर्वाकुर महिला बचत गट, स.नं.१३, सातववाडी, गोंधळेनगर, हडपसर,पुणे २८ यांचे होणारे बिल वेळोवेळी अदा करणेस,
३. वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार दिनांक २४/१०/२०२० रोजी पासून सदरचे काम संपेपर्यंत करणेस,
४. दिनांक २४.१०.२०२० ते दिनांक १०.११.२०२० या कालावधीसाठी दैनंदिन सकाळी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण यांचा खर्च १३८०x१८४.५=२,५४,६१०+३०,५५३=२(१२%जी.एस.टी) एकूण र.रू.२,८५,१६३=२ ठेकेदार मे.दुर्वाकुर महिला बचत गट यांना अदा करणेत येणार आहे.
५. मे.दुर्वाकुर महिला बचत गट, स.नं.13, सातववाडी, गोंधळेनगर, हडपसर,पुणे २८ यांचेकडून सदर कामात कोणताही हलगर्जीपणा झाल्यास त्यांची नेमणूक तात्काळ रद्द करणेस व त्यांच्याशी केलेला करार संपुष्टात आणनेस. तसेच, अतिक्रमण विभाग, पुणे महानगरपालिका या विभागाकडून पुणे शहरासाठी एकत्रित जेवण पुरविणेसाठीची कार्यवाही सुरु आहे. त्यामध्ये र.रु.१८४=५० प्रति दिन/व्यक्ति+जीएसटी या दराने जेवन पुरविणेत येत आहे. त्यानुसार कै. रामचंद्र (अप्पा) बनकर इंग्लिश मिडीयम स्कूल (मनपा शाळा), गोंधळे नगर, हडपसर, पुणे २८ या ठिकाणी जेवण पुरवठा करणेस,

**विषय क्र. ९०५**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) मधील तरतुदीनुसार नगररोड-वडगावशेरी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत स.नं. ०४ रक्षकनगर खराडी, आपले घर शाळा क्र. १५०, लोणकर शाळा, आनंदऋषी शाळा येथे तयार करणेत आलेल्या विलगीकरण कक्षासाठी सॅनिटायझर, साबण, मनुष्यबळ व इतर साहित्य पुरविणेसाठी खालील बाबी मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/परि.क्र.१/५३४ दि. ३०/१२/२०२० चे पत्र.

१) प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र. RE17F257, Covid 19 अंतर्गत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधून रक्कम अदा करणेस,
२) मे.हरिप्रिया कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक २५/३/२०२० ते ३१/७/२०२० पर्यंतचे र.रुपये २२,७२,६६८=६६ बिल अदा करणेस,

**विषय क्र. ९०६**

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत धनकवडी सहकारनगर कार्यालयांचे अंतर्गत (१) श्रीशिवाजी मराठा संस्थेचे मुलांचे वसतीगृह तळजाई पायथा,पुणे. (२) श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतीगृह आंबेगाव बु.पुणे. (३) पुणे विद्यार्थी गृहाचे मुक्तांगण इंग्लिश स्कुल, अरण्येश्वर,पुणे. (४) गेणुजी बेलदरे मनपा शाळा, जांभुळवाडी रोड, पुणे. (५) अभिनव इंग्लिश स्कुल,स.नं.१३,कात्रज बायपास रोड, आंबेगाव बुद्रुक,पुणे-४६ येथे स्थापित करण्यात आलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/अवॅटेड केंद्र येथे दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन दुपारचा चहा,लहान मुलांसाठी दुध व बिस्कीट गरजेनुसार बिस्लरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन (प्रोप्रा. कृष्णा माळी) यांचेकडून दि.०९/०४/२०२० पासून आणि अवॅटेड सेंटर उभारणेकरिता इमारती/रुममधील सामान हलविणे, स्थापत्य विषयक कामे करणे व काही वस्तु (सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने आणि काही वस्तु सरळ बाजारातुन रास्त दराने) खरेदी करुन पुरविणे व अवॅटेड सेंटर येथील साफसफाई ठेकेदार मे. शारदा सर्व्हिसेस यांचेकडून दि. १५/६/२०२० पर्यंत काम करुन घेतल्याने ही कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये करणेस मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता मिळाली असून सदर बाब तसेच मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामधील अ. क्र. १४ मधील एकुण कामांचा खर्च र.रुपये **६०,४९,६६६=०२** तसेच मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामधील अ.क्र. १ ते १६ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार दिनांक ०९/०४/२०२० पासुन पुढील काळासाठी सेंटर चालु असे पर्यंत व सदरचे काम संपेपर्यंत करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांचेकडे पश्चात माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/परि.क्र.३/५३५ दि.३०/१२/२०२० चे पत्र.

प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.